नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे | Year - 3rd | अंक - १६१ | Issue - 161 | वार शुक्रवार दि. ३१ ऑक्टोबर २०२५ | Blow- Friday Date 31 October 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## जनसेवेतील संस्काराचा वारसा जपणारे

# लोकनायक मिलन (दादा) कल्याणशेट्टी











कै. पंचपा कल्याणशेट्टी (सर) यांच्या जनसेवेची वारसा सागणारे मिलन दादा कल्याणशेट्टी यांनी आल्पावधीतच आपल्या कामाची छाप पाडली आहे. अत्यंत कमी वयात नगरसेवक म्हणून निवडून आल्यानंतर आपल्या कामाची एक वेगळी योजना राबवून ते इतरांसाठी आदर्श निर्माण करीत आहेत. विवेकानंद प्रतिष्ठानच्या समाजकार्याच नियोजन प्रमुख म्हणून त्यांनी अतिशय चोख काटेकोर पणे नियोजन करून समाजपुढे एक सामाजिक दिशा दाखवू दिले आहे प्रतिष्ठानाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विवाह सोहळा नियोजन आणि त्यातून गोर गरीब लोकांना मिळणार आनंद एक वेगळाच सांगून जातो योग गुरु रामदेव बाबाच्या अक्कलकोट येथील योग शिबीर भाऊ आ. सचिन कल्याणशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली योग शिबीर घेण्यात आले यामुळे शहरातील वातावरण योगामय झाले होते २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या सभेचे नियोजन पाहुन स्वतः अमितभाई शहा यांनी मिलन कल्याणशेट्टी यांना शुभेच्छा दिले ज्ञानयोगी सिध्देश्वर महाराज, विजापूर यांची एक महिना प्रवचन सेवा नियोजन यशस्वीपणे पार पाडले. कुठलेही कार्यक्रम असो की उपक्रम नेहमी पाठीमागे राहुन बारीक सारीक गोष्टीचे बारकाईने नियोजन करत सामान्य कार्यकत्यांप्रमाणे कुठलाही अहंभावना न ठेवता काम करत असतात त्यांच्या मार्गदर्शनाखाली काम करताना तरुणांनी अत्यंत शात, संयमी नेहमीच इतरांच्या सुख दुःखात सामील होण्याच्या गुणधर्मामुळे एकदा एखादा माणूस त्यांच्याशी जोडला गेला की, तो कायमचाच जोडला जातो. त्यांच्या या स्वभावगुणांमुळे इतरही पक्षांतले त्यांचे चाहते मित्र बनले आहेत , जे पक्षभेद विसरून समाजकार्यासाठी सर्व जाती धर्मातील लोकांना सोबत घेऊन निस्वार्थी काम करत असल्याने शहरातील युवाचे ओढ मिलन दादा कल्याणशेट्टी यांच्याकडे आहे कुठलेही काम कार्यकर्ता घेऊन आल्यावर त्याचे करून दिल्यावर त्याच्या चेहऱ्यावर दिसलेलं हास्य खूप काही सांगून जातात त्याच्यातील विकास कामाचे नियोजन शहराच्या विकासासाठी त्याचे आराखडा पाहता यावेळी मिलन दादा कल्याणशेट्टी यांना नगराध्यक्ष केल्यास अक्कलकोट शहर राज्याच्या एक वेगळे शहर म्हणून आदर्श निर्माण होईल यात शंका नाही

**कमलाकर सोनकांबळे**
संपादक : दै. यश सिद्धी न्यूज
मो. नं. ९९२१९८८३५८



मिलन कल्याणशेट्टी उच्चशिक्षित नगरसेवक असून पदवीधर असून सोलापूर विद्यापीठाचे सिनेट सदस्य म्हणून काम केले आहेत, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय वारसा त्यांनी उचलला आहे. तशी त्यांची कौटुंबिक पार्श्वभूमी पाहता कै. पंचपा कल्याणशेट्टी सरांचे सामाजिक वारसा आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली मिलन कल्याणशेट्टी राबवित आहेत यांचे वडील मलिनाथ कल्याणशेट्टी हे शिक्षक होते तर आई मंगलाबाई या जि.प सदस्या आहेत भाऊ आमदार सचिन कल्याणशेट्टीच्या मार्गदर्शनाखाली समाजकार्य सुरू आहे. भाऊ मनोज दादा कल्याणशेट्टी यांनी अभियांत्रिकी शिक्षण (पान ४ वर..)





## संपादकीय....

# दूरदृष्टीचे नेतृत्व मिलनदादा

दूरदृष्टीचे नेतृत्व असलेले मिलन कल्याणशेट्टी कमी वयामध्ये नगरसेवक म्हणून अक्कलकोट शहरांमध्ये विकास कामाचे सपाट लावून अक्कलकोट शहर एक मॉडेल बनण्यासाठी प्रयत्नशील आहेत मिलन कल्याणशेट्टी यांचे कामाचा चुणूक पाहता त्यांच्याकडे मोठ्या प्रमाणात युवकांचे ओढ लागलेले असून त्यांना अक्कलकोट तालुक्यात युवकांचे आयकॉन म्हणून ओळखले जाऊ लागले मिलन कल्याणशेट्टी हे कुठल्याही काम असू दे तातडीने ते काम करण्यासाठी पुढाकार घेऊन ते तडीस नेतात कुठलेही गोरगरिबाचे समस्या असू दे अडचण असू दे ते सोडवण्यासाठी ते सतत प्रयत्नशील असतात आम दार सचिन दादा कल्याणशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली कै. पंचपा कल्याणशेट्टी सर यांचे जनसेवेचा संस्काराचा वसा झोपासण्यासाठी कल्याणशेट्टी कुटुंब अग्रेसर असून त्यामध्ये मिलन कल्याणशेट्टी त्याच पावलावर पाऊल ठेवून पुढे सामाजिक कार्य जोपासत आहेत मिलन कल्याणशेट्टी हे लोकमान्य गणेश उत्सवाच्या माध्यमातून अनेक सामाजिक उपक्रम राबवलेले आहे तसेच विवेकानंद प्रतिष्ठानच्या वतीने दर वर्षी सामुदायिक विवाह आयोजन करण्यात येतो त्यामध्ये अनेक गोरगरीब कुटुंबाचे कल्याण करण्याचे काम प्रतिष्ठान माध्यम ातून करण्यात येत आहे. नगर परिषदेच्या माध्यमातून अक्कलकोट शहरांमध्ये एक वेगळा मॉडेल निर्माण करून अक्कलकोटचा विकासाचा गंगा महाराष्ट्राचा एक वेगळी ओळख करण्यासाठी मिलन दादा कल्याणशेट्टी यांनी करीत असून नगरसेवक असल्याचा गर्व नाही सर्व तरुणांमध्ये सर्वसामान्य सारखे मैत्रीचे नाते जपणारे प्रसंगी स्वतः पडेल ते काम करणारे मिलन कल्याणशेट्टी हे एक युवा नेतृत्व आहे. शांत व संयमी नेतृत्वाचा इतिहास घडवण्याचा व जनसेवेतील संस्काराचा वारसा जपणारे लोकनायक म्हणून मिलन कल्याणशेट्टी यांच्याकडे युवकांनी बघत असतात येणाऱ्या काळात अक्कलकोट नगरध्यक्ष पद मिळाल्यास उद्योग धंदे सह तीर्थ क्षेत्र विकास मोठ्या प्रमाणात होईल व अनेक लहान मोठे व्यवसाय चालू होतील श्री स्वामी समर्थच्या चरणी एकच प्रार्थना करू या येणाऱ्या काळात मिलन दादा कल्याण शेट्टी यांच्या माध्यमातून अक्कलकोट शहर तालुक्यात विकास कामे मोठ्याने होऊ द्या विकासापासून अनेक वर्ष वंचित असलेले तालुका विकास घडण्यासाठी साथ देऊ या.

## जनसेवेतील संस्काराचा वारसा जपणारे

# लोकनायक मिलन (दादा) कल्याणशेट्टी

(पान १ वरून..) घेऊन पतसंस्था, मल्टिस्टेट बँक साभाळत आहेत तर भाऊ सागर कल्याणशेट्टी हे हन्नूर गावाचे उपसरपंच आहेत मिलन दादा कल्याणशेट्टी अकोट शहरातील प्रभाग क्रमांक १० मध्ये स्वच्छ भारत अभियान अंतर्गत मंजूर झालेल्या शौचालय बांधकामासाठी नागरिकांना अनुदान कमी पडत असल्याने स्वत शौचालय बांधकामास मदत केली. प्रभागात एलईडी लाईटची सोय केली. स्वच्छ भारत अभियानाच विविध उपाय योजनासाठी सतत प्रयत्नशील असतात अक्कलकोट शहरातील नव्याने सुरु होत असलेले बसस्थानक कामाची वेळोवेळी भेट देऊन लवकर काम पूर्ण करण्यासाठी प्रयत्नशील असून एक दिव्य भव्य वस्तू निर्मिती होत आहे त्याच बरोबर ग्रामदैवत मलिकार्जून मंदिर नव्याने बांधकाम चालू असून शहराच्या पर्यटन, भक्त याकडे मोठ्या प्रमाणात भविष्यात वाढले जातील याचं बरोबर गेल्या अनेक वर्षांपासून लोकम ान्य गणेश उत्सव मंडळाच्या माध्यमातून दर वर्षी विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येत असतात यात आरोग्य शिबीर, रक्तदान शिबीर, यासह अनेक सामाजिक उपक्रम घेत असताना आ- पली सांस्कृतिक काल टिकले पाहिजे म्हणून पारंपारिक



वाद्यच्या साहाय्याने मोठ्या संख्येने लेझीम पथकाच्या म ाध्यमातून गणरायाचे मिरणूक वाजता गाजत काढले जातात मानवीजीवांनावर कुठले ही नैसर्गिक संकट आल्यास प्रथम धावून जाऊन मदत करणारे नेता म्हणजेचं मिलन दादा, अतिवृष्टी मुळे अनेक ठिकाणी स्वतः जीव धोक्यात घालून जीव वाचवण्याचे प्रयत्न केले असून नुकसान ग्रस्त लोकांना तातडीने मदत करण्याचे काम मिलन दादा यांनी केले आहेत, अपघा- त असो किंवा हास्पिटल मदत असो कॉल आलं की त्वरित मदतीसाठी धा- वून जाऊन मदत करणारे म्हणजेच मिलन दादा, मिलन दादा व्यक्ती नसून विचार आहे अक्कलकोटच्या विकासासाठी झटणारा नेता आहे,

कोरोना काळामध्ये गोर गरीब लोकांना अन्न दान सोबत सेवा बजावणाऱ्या कर्मचारी यांना जेवण्याचे डब्बे देण्याचे काम विवेकानंद परिवाराच्या माध्यमातून केले आहेत सर्व जाती धर्मातील लोकांना सोबत घेऊन शहराच्या विकासासाठी पाळणाऱ्या युवा नेत्यास अक्कलकोट शहराच्या नगराध्यक्षपदी बसवणे म्हणजेच यावर्षीचे खरे वाढदिवस होईल

मिलन दादांना वाढदिवसा निमित्त स्वामी समर्थ यांच्या चरणी एकच मागणी दादांना नगराध्यक्ष करून अक्कलकोट शहराचे विकासाची गाडी सुस- ाट वेगाने जाऊ द्या अक्कलकोट नाव महाराष्ट्र मध्ये एक आदर्श म्हणून ओळखू द्या

– कमलाकर सोनकांबळे,
संपादक
दै. यश सिद्धि न्यूज
मो. ९९२१९८८३५८

















































हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

























# जनाचा आवाज युवा नेते

# मिलन (दादा) कल्याणशेट्टी

अक्कलकोट शहर आणि तालुक्यामध्ये, अनेक नेते झाले युवा नेते झाले सामाजिक कार्यकर्ते झाले, श्री स्वामी समर्थांची नगरी आणि त्यामध्ये विकासाची दिशा, नागरी विकास कसा झाला पाहिजे आणि, गेल्या ७० वर्षात कसा विकास झाला याचा जर चिंतन करायला गेलं तर एक निश्चित वाटतं की, ज्या पद्धतीने श्री स्वामी समर्थांच्या नगरीचा विकास व्हायला पाहिजे होता तसा झाला नाही. २०१७ च्या नगर परिषदेच्या निवडणुकीमध्ये, एका युवा नेत्याचा उगम झाला आणि थेट नगरसेवक पदापर्यंत मजल मारली, ते म्हणजे मिलन दादा कल्याणशेट्टी, दादा या नावाने प्रसिद्ध, कामाच्या बाबतीत अगदी दादा माणूस, अगदी कमी कालावधीमध्ये नगरसेवक झाले, आणि जनसेवेमध्ये इतकी प्रसिद्धी मिळाली, केवळ प्रसिद्धी बॅनर किंवा पेपर च्या प्रसिद्धी मधून नाही तर कामामधून, आपले सोबत असणारे कार्यकर्ते कसे सांभाळले पाहिजे त्याच्यासोबत कसे काम केले पाहिजे त्यांना त्यांच्या पोटाचा प्रश्न आहे ते मिटवता आला पाहिजे. एक बारकाईने विचार करणारा एक, साद्या भाषेत बोलायचे तर एक देव माणूस, ३१ नोव्हेंबर १९८९ साली, आई मंगल वडील मल्लिनाथ यांच्या पोटी जन्म झाला.शिक्षण एम. ए (मराठी). बी.पी.एड एक उच्चशिक्षित नेतृत्वाची, सुरुवात पाहायला गेलं. लोकमान्य गणेशोत्सव मंडळाच्या माध्यमातून, कोणत्याच पद्धतीची वर्गणी न घेता, अक्कलकोट शहरातील एक मोठ मंडळ, स्थापन करून युवकांमध्ये नवचैतन्य निर्माण केले, गणेश उत्सवाच्या कालावधीमध्ये, आरोग्य, स्वच्छता,स्त्रीभ्रूणहत्या, पाणी आडवा पाणी जिरवा, रक्तदान श्रेष्ठदान, रद्दीतून शिक्षण, व्याख्यानमालेचे नियोजन, सामाजिक प्रबोधनात्मक कार्यक्रम, भरीव असे कार्य, कमी कालावधीमध्ये अक्कलकोट शहराच्या चोही बाजूने, करून दाखवले, शांत संयमी, कामातून सगळ्याच प्रश्नाचे उत्तरे, सोलापूर विद्यापीठाच्या सिनेट सदस्य पदी निवड झाल्यानंतर, विद्यार्थी हिताचे निर्णय अत्यंत प्रभावीपणे घेतले, पदवीधरांचे काही प्रश्न असतील, परीक्षेचा विषय असेल प्रभावी परीक्षा कशा झाल्या पाहिजे या संदर्भात त्यांनी विद्यापीठात महत्त्वाचे मुद्दे मांडले, केवळ एका बोर्डाचे नगरसेवक म्हणून त्यांनी काम पाहिले नाही, अक्कलकोट नगरीच्या चोही बाजूने कसा विकास झाला पाहिजे थोरले बंधू आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली आपल्याला कसं काम करता आला पाहिजे ते स्वत: आपली दिशा ठरवत असत. अक्कलकोट नगर परिषदेचे, सफाई कामगारांना, त्यांना प्रवाह मध्ये आणण्याचा त्यांनी महत्त्वपूर्ण निर्णय घेतला, त्यांचे वेतन असतील भत्ते असतील किंवा इतर काही त्या संदर्भातले निर्णय असतील त्यांनी ती अंमलबजावणी सुद्धा करून दाखवली, संपूर्ण सफाई कामगारांना दीपावली मध्ये, दिपावलीचे कीट वाटप असेल किंवा साखर वाटप असेल असे सुस्ते उपक्रम त्यांनी राबवले, त्यांच्या नेतृत्वामध्ये शहरातील हजारो तरुण काम करत आहेत, अशा प्रकारच्या कामातून मिलन दादा कल्याणशेट्टी,एक युवकांचे ताईतच तयार झाले, येणाऱ्या काळामध्ये त्यांच्या, नेतृत्वाची शक्ती नगर परिषदेमध्ये नगराध्यक्ष म्हणून दिसेल, अशा प्रभावशाली युवा नेत्यास, वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा..

लेखक :– पत्रकार गौतम बाळशंकर
(ग्रामपंचायत सदस्य हन्नूर)













